# बृहन्मुंबई महानगरपालिका
## परिपत्रक

विषय:- गोपाळकाला (दहीहंडी) निमित्त शनिवार दि.१६ ऑगस्ट २०२५ आणि अनंत चतुर्दशी निमित्त शनिवार दि.०६ सप्टेंबर २०२५ रोजी स्थानिक सुट्टी जाहीर करणेबाबत.

संदर्भ:- १) शासन परिपत्रक क्र.सार्वसु-११२४/प्र.क्र.९१/जपुक (२९) दि. १८ डिसेंबर,२०२४

२) प्रकाअ/ ०९/२०२४-२०२५ दि.१३.०१.२०२५

उपरोक्त संदर्भ क्र.०१ अन्वये महाराष्ट्र शासनाने दि.१८ डिसेंबर,२०२४ रोजी प्रसारीत केलेल्या शासन परिपत्रकान्वये गोपाळकाला (दहीहंडी) निमित्त शनिवार दि.१६ ऑगस्ट २०२५ आणि अनंत चतुर्दशी निमित्त शनिवार दि.०६ सप्टेंबर २०२५ रोजी मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयातील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालयांना स्थानिक सुट्टी (Local Holiday) जाहीर केली आहे.

त्याअनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ठाणे जिल्हयातील महानगरपालिका कार्यालयांसह, मुंबईतील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यालयातील कामगार/कर्मचा-यांना उपरोक्त संदर्भाधिन क्र.२ येथील परिपत्रकातील तरतूदी सापेक्ष अत्यावश्यक सेवा वगळून गोपाळकाला (दहीहंडी) निमित्त शनिवार दि.१६ ऑगस्ट २०२५ आणि अनंत चतुर्दशी निमित्त शनिवार दि.०६ सप्टेंबर २०२५ रोजी स्थानिक सुट्टी राहील.

प्रस्तुत परिपत्रक http://portal.mcgm.gov.in आणि http://mybmcemp.mcgm.gov.in/circular या संकेतस्थळांवर उपलब्ध करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| सही/- १०.०२.२०२५ | सही/-१३.०२.२०२५ | सही/- २५.०२.२०२५ | सही/- २८.०२.२०२५ |
| (शारदा शा.गोसावी) | (किशोर गांधी) | (डॉ.अश्विनी जोशी) | (भूषण गगराणी) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी(प्र) | उप आयुक्त (सामान्य प्रशासन) | अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) | महानगरपालिका आयुक्त |

महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,
क्रमांक:प्रकअ/१५९/सर्वसा(एमओपी/३५६)
दिनांक: दि.१२ मार्च,२०२५

प्रत-----------------------------------------------------------(जादा----------- प्रतीसह)
माहितीकरिता व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरिता कृपया अग्रेषित.

L.L. Cardeza 12/3/25
(लिआना लॉ.कार्डेझ)
प्रशासकीय अधिकारी (आयुक्त)
महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय

**गोपाळकाला (दहिहंडी) व अनंत चतुर्दशी निमित्ताने स्थानिक सुट्टी जाहीर करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः सार्वसु-११२४/प्र.क्र.९१/जपुक (२९)**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगरु चौक,
मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १८ डिसेंबर,२०२४.

**शासन परिपत्रक:**

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. सार्वसु-११९६/प्र.क्र.५/९६/२९, दिनांक १८ सप्टेंबर, १९९६ अन्वये मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयातील शासकीय /निमशासकीय कार्यालयांना प्रतिवर्षी "अनंत चतुर्दशी" या दिवशी आणि सन २००७ पासून गोपाळकाला (दहीहंडी) निमित्ताने मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांसाठी स्थामिक सुट्टी (Local Holiday) जाहीर करण्यात येते. त्यानुसार सन २०२५ मध्ये पुढीलप्रमाणे मुंबई व मुंबई उपनगर जिल्हयातील सर्व शासकीय /निमशासकीय कार्यालयांना याद्वारे स्थानिक सुट्टी (Local Holiday) जाहीर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सुट्टीचा दिवस | इंग्रजी तारीख | भारतीय सौर दिनांक | वार |
|---|---|---|---|---|
| १ | गोपाळकाला (दहिहंडी) | १६ ऑगस्ट, २०२५ | २५ श्रावण शके १९४७ | शनिवार |
| २ | अनंत चतुर्दशी | ०६ सप्टेंबर, २०२५ | १५ भाद्रपद शके १९४७ | शनिवार |

२. हे आदेश मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील राज्य शासकीय/निमशासकीय कार्यालयांना लागू राहतील.

३. वरील स्थानिक सुट्टी शासन निर्णय क्रमांक पी अॅन्ड एस.नंबर पी-१३/II/बी, दिनांक ५ नोव्हेंबर, १९५८ मधील तरतूदीनुसार जाहीर करण्यात येत आहे .

४. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१२१८१८०२०५४५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DILIP N DESHPANDE

Digitally signed by DILIP N DESHPANDE
Date: 2024.12.18 18:03:08 +05'30'

( दिलीप देशपांडे )
**शासनाचे उप सचिव**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
२. मा.राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक,
३. मा.सभापती/मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधान परिषद/विधानसभा यांचे सचिव
४. मा.उप सभापती/मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधान परिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव
५. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सर्व मा. मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
८. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान परिषद / विधानसभा यांचे स्वीय सहाय्यक,
९. मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
१०. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना शाखा), मंत्रालय, मुंबई,
* १२. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई,
* १३. प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
१४. मुख्य आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई
१५. मुख्य आयुक्त, लोक सेवा हक्क आयोग, मुंबई
* १६. सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, १ ला मजला, मादाम कामा रोड, मुंबई
* १७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
* १८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

* १९. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२०. विभागीय आयुक्त, कोकणभवन, नवी मुंबई,
२१. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई,
२२. जिल्हाधिकारी, मुंबई शहर, मुंबई उपनगर,
२३. मंत्रालयाच्या निरनिराळया विभागांखालील मुंबई शहर/मुंबई उपनगर जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख,
२४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२५. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
* २६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
(त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आवश्यक ते प्रसिध्दीपत्रक निर्गमित करावे, तसेच आकाशवाणी व दूरदर्शनद्वारे प्रसिध्दी द्यावी)
२७. निवड नस्ती / सामान्य प्रशासन विभाग-२९

* पत्राद्वारे

बृहन्मुंबई महानगरपालिका
आयुक्तांचे कार्यालय
23 DEC 2024
समय ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८
क्रमांक एम ओर्पी / ३५६

प-३

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## कामगार विभाग

प्रकाअ/ ०९ **परिपत्रक** दि.१३.०१.२०२५
२०२४-२०२५

विषय:- सन २०२५ या सालाकरिता महानगरपालिका कामगारांना द्यावयाच्या सार्वजनिक सुट्टयांबाबत.

संदर्भ:-1) एलओ/१० दि.०९.०८.१९८८
2) प्रकाअ/०३ दि.०१.०१.२०२४
3)प्रकाअ/५१७ दि.०८.०९.२०२२

उपरोक्त संदर्भ क्र.1 नुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अत्यावश्यक सेवेतील कामगारांना २०२५ या सालाकरीता सार्वजनिक सुट्टयांपैकी खालील 12 सुट्टया मिळतील.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | १९ फेब्रुवारी , २०२५ | बुधवार |
| २) | होळी (दुसरा दिवस) | १४ मार्च , २०२५ | शुक्रवार |
| ३) | रमझान ईद (इद-उल-फितर) (शव्वल) (1) | ३१ मार्च , २०२५ | सोमवार |
| ४) | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल, २०२५ | सोमवार |
| ५) | महाराष्ट्र दिन | ०१ मे, २०२५ | गुरूवार |
| ६) | बुध्द पौर्णिमा | १२ मे, २०२५ | सोमवार |
| ७) | स्वातंत्र्य दिन | १५ ऑगस्ट, २०२५ | शुक्रवार |
| ८) | गणेश चतुर्थी | २७ ऑगस्ट,२०२५ | बुधवार |
| ९) | महात्मा गांधी जयंती/दसरा | ०२ ऑक्टोबर, २०२५ | गुरूवार |
| १०) | दिवाळी अमावस्या (लक्ष्मीपूजन) | २१ ऑक्टोबर, २०२५ | मंगळवार |
| ११) | गुरूनानक जयंती | ०५ नोव्हेंबर २०२५ | बुधवार |
| १२) | ख्रिसमस | २५ डिसेंबर, २०२५ | गुरूवार |

2. किटकनाशक अधिकारी, कार्यकारी अभियंता परिवहन (शहर, उपनगरे आणि पापुमनि), प्रमुख अभियंता (मलनि:स्सारण प्रचालने), उद्यान अधिक्षक इ. खात्यामध्ये काम करणा-या कामगारांना त्याचप्रमाणे ज्या कामगारांना सध्या १६ सुट्टया देण्यात येतात, अशा खात्यातील कामगारांना उपरोक्त १२ सुट्टया अधिक खाली नमूद केलेल्या ४ सुट्टया मिळतील.

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | महाशिवरात्री | २६ फेब्रुवारी,२०२५ | बुधवार |
| 2) | महावीर जयंती | १० एप्रिल ,२०२५ | गरूवार |
| 3) | ईद-ए-मिलाद | ०५ सप्टेंबर ,२०२५ | शुक्रवार |
| 4) | दिवाळी (बलिप्रतिपदा) | २२ ऑक्टोबर, २०२५ | बुधवार |

3. घन कचरा व्यवस्थापन खाते, सुरक्षा खाते, पाणी खात्यातील जलवाटप नियंत्रण (शहर) खात्यातील कामगारांना आणि मुंबई अग्निशमन दलातील प्रत्यक्ष कार्यवाहीवरील ८ तास पाळीपद्वतीतील (अधिकारी व कर्मचारी) यांना सार्वजनिक सुट्टयांऐवजी २७ नैमित्तीक रजा दरवर्षी दिल्या जातात त्या हया ही वर्षी देखील दिल्या जातील.

4. ज्या कामगारांना रुढीप्रमाणे सार्वजनिक सुट्टयांचे फायदे मिळतात त्यांना सार्वजनिक सुट्टया त्यांच्या विभाग आणि खात्यातील पध्दतीनुसार मिळतील.

5. देवनार पशुवधगृह येथे आवश्यक सेवेत काम करणा-या कामगारांना पशुवधबंदीदिनाबाबत महाराष्ट्र राज्यशासन व महानगरपालिकेच्या ठरावानुसार सार्वजनिक सुट्टया महाव्यवस्थापक, देवनार पशुवधगृह जाहिर करतील.

6. अतिरिक्त जाहिर झालेल्या सार्वजनिक सुट्टया अत्यावश्यक सेवेमध्ये काम करणा-या कामगारांना लागू नाहीत. त्यामुळे अतिरिक्त जाहिर झालेल्या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी काम केल्याबद्दल प्रत्येक सार्वजनिक सुट्टीच्या मोबदल्यात एक जादा अर्जित रजा सदर कामगारांच्या अर्जित रजेच्या खात्यामध्ये वर्षाच्या शेवटी जमा केली जाईल. तथापि कामगाराने सदर वर्षामध्ये विनावेतनी रजा घेतली असल्यास अर्जित रजेच्या खात्यामधून तेवढीच रजा कमी करण्यात येईल. कामगारांच्या अर्जित रजेच्या खात्यामध्ये अशा प्रकारे जमा करण्यात आलेल्या रजेबाबत दि.३१.०३.२०२६ पूर्वी कार्यवाही पूर्ण करावी. संबंधित खाते प्रमुख/विभाग प्रमुखांनी हे काम दि. ३१.०३.२०२६ पूर्वी पूर्ण केले आहे याची खात्री करावी.

7. मान.महानगरपालिका आयुक्त यांच्या आदेश क्र.एमजीसी /एफ/७६७६ दि.०७.०९.२०२२ अन्वये परिपत्रक क्र. प्रकाअ/५१७ दि.०८.०९.२०२२ नुसार निर्गमित केलेल्या सुचनांप्रमाणे, संबधित खाते/विभागातील कामगारांना राज्य शासनाने जाहिर केलेल्या अतिरिक्त सार्वजनिक सुट्टया उदा गोपाळकाला , (दहिहंडी),अनंत चतुर्दशी (गणेश विसर्जन) इत्यादी लागू राहतील.

8. प्रचलित पध्दतीनुसार पाळीमध्ये काम करणा-या कामगारांना चक्रांकित पध्दतीने मिळणा-या साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी आल्यास त्या कामगारास त्या बदल्यात एक सुट्टी दिली जाईल.

सदर परिपत्रकाची प्रत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://hrcircular.mcgm.gov.in/hr/circular/GAD/CHLO या संकेतस्थळावरसुद्धा उपलब्ध आहे.

| | |
|---|---|
| सही/-०६.०१.२०२५ | सही/-०८.०१.२०२५ |
| (सुनिल तु.जांगळे ) | (किशोर गांधी ) |
| प्रमुख कामगार अधिकारी | उप आयुक्त (सा.प्र.) |

प्रत:------------------------------------- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

सुतु जांगळे
१३।०१।२०२५
प्रमुख कामगार अधिकारी यांजकरिता